# ‘‘आम्ही भिडे’’ अनियतकालिक

नवीन व ताज्या माहितीसाठी एखादे लिखित संपर्क माध्यम हवे अशी आवश्यकता वाटली, त्याचप्रमाणे भिडे कुलबंधु/भगिनी/माहेरवाशिणींना आपल्या विचारांची देवाण घेवाण करण्यासाठी एखादे व्यासपीठ उपलब्ध असावे या उद्देशाने ‘आम्ही भिडे’ या कुलवार्ता अनियतकालिकाचा पहिला अंक २००३ साली सांगली येथे झालेल्या भिडे कुलसंमेलनात प्रकाशित करण्यात आला. पहिला अंक प्रकाशित झाल्यावर अनेक प्रतिक्रिया आल्या, त्यापैकी अंकास मूल्य ठेवावे, अंक स्वत:च्या पायावर उभा राहील अशी कायम स्वरूपी व्यवस्था करावी, अशा सकारात्मक आणि उत्साहवर्धक प्रतिक्रीया मिळाल्या.

दुसरा अंक तळेगाव येथे २००५ मध्ये झालेल्या कुलसंमेलनात प्रकाशित केला आणि तिसरा अंक फेब्रुवारी २००९ मध्ये (अलिबाग) किहीम येथे झालेल्या संमेलनात प्रकाशित केला.

ज्या भिडे कुलबंधू/भगिनींना लिखाणाची आवड व क्षमता आहे. अथवा तरुणांसाठी नोकरी व्यवसायाची नवीन दालने, किंवा ज्येष्ठांना अध्यात्म किंवा योगाची आवड, भिडे कुलातील सभासद किंवा त्यांच्या मुलांना मिळालेल्या यशाबद्दलची दखल घेणे. इत्यादी बाबी गृहीत धरून अंकाचे आयोजन करण्यात आले.

वास्तविक ‘आम्ही भिडे’ हे नियतकालिक व्हावे असा प्रयत्न आहे परंतू त्यासाठी भिडे सभासदांचा सहभाग व सहकार्य अपेक्षित आहे. तसेच या वेळच्या सुमारे १२०० ते १४०० अंकांचे वितरण अधिक त्याचे पोस्टेजसाठी येणारा खर्च, सद्य परिस्थितीत आर्थिक दृष्ट्या प्रतिष्ठानला पेलविणे कठिण आहे. तरी सुद्धा प्रत्येक भिडे कुल संमेलनात ‘आम्ही भिडे’ चा अंक प्रकाशित व्हावा असे प्रतिष्ठानला वाटते. अर्थात या परिस्थितीत बदल होऊन प्रतिष्ठान आर्थिकदृष्ट्या सुदृढ झाल्यास वर्षातून चार वेळा हा अंक प्रकाशित करण्याचा मानस आहे. त्यासाठी भिडे कुलातील प्रत्येकाचे सहकार्य व मदतीची आवश्यकता आहे.